**महाराष्ट्र शासन**
महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
ए/8, स्टेट एम्पोरिया बिल्डिंग, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली – 110 001
इ-मेल आयडी : micnd.estab@gmail.com, दूरध्वनी क्र. 011-23363773/23367830

## भरती जाहिरात

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली कार्यालयातील आस्थापनेवर वर्ग 3 पदाची भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली असून याबाबत यापूर्वी जाहीरात प्रकाशित करण्यात आली होती.

कार्यालयातील बिंदूनामावली मध्ये झालेल्या बदलामुळे प्रकाशीत करण्यात आलेल्या जाहीराती मधील **वाहनचालक** पदासंदर्भात बदल करण्यात आलेला आहे. याबाबत दै.लोकमत (नागपूर, औरंगाबाद, पुणे व नाशिक आवृत्ती) मध्ये दि. 19.10.2013 व महाराष्ट्र टाईम्स (मुंबई आवृत्ती) मध्ये दि.20.10.2013 रोजी वृत्तपत्रामध्ये शुद्धीपत्रक प्रकाशित करण्यात आले आहे. जाहीरातीमध्ये झालेला बदल खालील प्रमाणे आहे. सदर पदांसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या भरतीसाठी इच्छुक उमेदवारांनी सोबतच्या विहित नमुन्यात आपले अर्ज खाली पत्त्यावर दिनांक 22 नोव्हेंबर 2013 पर्यंत नोंदणी टपालाद्वारे सादर करावेत. त्यानंतर आलेल्या किंवा अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. यापूर्वी करण्यात आलेल्या अ.जा.संवर्गातील उमेदवारांनी पुन्हा अर्ज करु नये.

लिफाफ्यावर "**वाहनचालक" पदासाठी अर्ज** असे स्पष्ट नमूद करावे. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. पत्रव्यवहाराचा पत्ता : **उपसंचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, ए/8, स्टेट एम्पोरिया बिल्डिंग बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली- 110 001.**

### भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **वेतनश्रेणी** | **तपशिल** | **एकूण पदसंख्या** |
|---|---|---|---|---|
| 1 | **वाहनचालक** | ₹5200-20200 ग्रेड वेतन 1900 | अ.जा.-1 | 1 |

**(अ) सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादींचा तपशिल**

**1.वरील पदांसाठी मराठी/हिंदी भाषेचे ज्ञान अवगत असणे आवश्यक.**

**2.वय,शैक्षणिक, अनुभव व इतर आवश्यक/प्राधान्य देण्यासाठी यथास्थिती अहर्ता:**

| अ. क्र. | पद | वयोमर्यादा | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| 2. | वाहनचालक | किमान 18 वर्षे कमाल 33 वर्षे (शासकीय नियमानुसार 5 वर्षे शिथील)<br>(अर्ज करावयाच्या शेवटच्या दिवशी **दि.22.11.2013** रोजीचे वय गणण्यात येईल) | 1. मान्यता प्राप्त शाळेतून आठवीची परीक्षा उत्तीर्ण,<br>2. वाहनचालकाचा परवाना | 1. दोन वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव<br>2. दिल्लीचे भौगोलिक ज्ञान<br>3. आयटीआय प्रशिक्षीत/वाहन दुरुस्तीचे ज्ञान |

**(ब) अटी व शर्ती :**

| | |
|---|---|
| 1) | उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धाराण केली म्हणजे मुलाखतीला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा त्याला हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| 2) | (अ) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10, दि.27 जुन 2011 नुसार ज्या परिक्षार्थ्यांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नाही त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे.<br>(ब) सदर परिक्षार्थ्यांकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या परिक्षार्थ्यांनी आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकारात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.<br>(क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परीक्षार्थी/ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक आहे. |
| 3) | छाननी अंती पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाईल. **उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.** पात्र उमेदवारांना परीक्षेचा दिनांक, परीक्षेचे ठिकाण व बैठक क्रमांक अलाहिदा कळविण्यात येईल. |
| 4) | शासन निर्णय दि.19.10.2007 नुसार गट-क मधील संवर्गातील पदांसाठी उमेदवारांची निवड करताना लेखी परीक्षा/मुलाखत पुढील प्रमाणे घेण्यात येईल.<br>**वाहनचालक पदा**साठी मराठी, हिंदी व सामान्यज्ञान या विषयांवरील एकूण 100 गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांचीच 80 गुणांची व्यावसायिक चाचणी व 20 गुणांची मुलाखत घेतली जाईल. परीक्षा नवी दिल्ली येथे घेण्यात येईल. |
| 5) | उमेदवारांना परीक्षेस/मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल. कोणतेही प्रवासभाडे देण्यात येणार नाही. |
| 6) | मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्या संदर्भातील जात प्रमाणपत्राच्या साक्षांकित विहीत प्रती जोडाव्यात. साक्षांकित जात प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास त्यांनी नियुक्ती झाल्यानंतर जाती प्रमाणपत्राची वैधता 6 महिन्यात सादर करणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन परिपत्रक दि.26.3.2010 च्या तरतुदीप्रमाणे नियुक्तीपूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. तथापि, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि.12.12.2011 अन्वये सरळ सेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे. अशा उमेदवारास त्याच्या नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. परंतु नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास शासन निर्णयानुसार त्याची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल. त्यानंतर त्या उमेदवाराचा त्या पदावर कोणताही दावा राहणार नाही. |

| | |
|---|---|
| 7) | निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित आर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करतांना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. |
| 8) | विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांना त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमुद करावा. अर्जासोबत संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| 9) | सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17(2010)/12, दि.28.03.2005 व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01.07.2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-2005 अन्वये दि.28.03.2005 नुसार दि. 28.03.2005 रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. |
| 10) | अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे स्पष्ट व वाचनीय असणे आवश्यक आहे. कागदपत्रे वाचनीय नसतील तर त्यांचा विचार केला जाणार नाही व अर्ज निकाली काढला जाईल. |
| 11) | प्रशासकीय कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत घट होऊ शकते. याबाबत सर्व अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे. |
| 12) | वाहनचालक या पदासाठी अर्ज करणाऱ्यांनी बँकेचे धनाकर्ष अनुदान शुल्कापोटी मागासवीर्गीय उमेदवाराने अर्जासोबत रुपये 100/- भारतीय स्टेट बँकेचे धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) जोडावेत. कोर्ट फी स्टँप व भारतीय पोस्टल ऑर्डर स्विकारले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. डिमांड ड्राफ्टच्या पाठीमागे उमेदवाराने आपले संपूर्ण नांव पेन्सिलने लिहावे. भारतीय स्टेट बँकेचा धनाकर्ष **Dy. Director (Inf.), Maharashtra Information Centre, New Delhi-110001** यांचे नांवे काढून जोडणे आवश्यक आहे. अन्य कुठल्याही स्वरुपातील शुल्क स्विकारले जाणार नाही. |
| 13) | उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| 14) | शैक्षणिक आर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. छायांकित प्रती हया राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात, तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास उमेदवारास कोणत्याही क्षणी अपात्र ठरविण्यात येईल. |
| 15) | सदरच्या रिक्त असलेल्या पदांवर नियुक्ती करण्याचे अधिकारी अंतिमतः अध्यक्ष, विभागीय निवड समिती, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांना राहतील. साधारणतः नियुक्तीनंतर पाच वर्षापर्यंत बदलीची मागणी मान्य केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. |
| 16) | मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास रुजू करुन घेण्यात येईल. |
| 17) | ही जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in, संकेत स्थळावर **रोजगार** विभागात, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या http://dgipr.maharashtra.gov.in या संकेत स्थळाच्या होमपेजवर **निविदा/भरती/आवाहन** या विभागात, तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या www.mahanews.gov.in या संकेत स्थळाच्या '**नोकरी शोधा**' या या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |

**(क) सुचना :**

1. उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात स्वतःच्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित करुन 30X20 से.मी. या आकाराच्या जाड कागदावर अर्ज करावयाचा आहे.
2. सोबत जोडलेल्या अर्जाच्या विहित नमुन्यातच अर्ज करावा.
3. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, जात, पोटजात, जातीचे प्रमाणपत्र, कामाचा अनुभव इत्यादीबाबत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या सत्यप्रती जोडाव्या. मूळ प्रती जोडू नयेत.
4. अर्जदाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडावे.
5. अर्जासोबत 22 से.मी.X 12 से.मी. आकाराचा पोष्टाचे रुपये 5+2 चे तिकिट लावलेला व स्वतःचे नांव व पूर्ण पत्ता लिहीलेला लिफाफा पाठवावा व अर्जावर पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवावा. फोटोवर उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी करावी.
6. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या विभाग प्रमुखांनी संमत्ती दिली असेल तरच त्यांचे अर्ज ग्राहय धरण्यात येतील. तसेच कार्यालय प्रमुखांमार्फत अर्ज वेळेवर पाठविणे आवश्यक आहे.
7. अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, जातीचा पुरावा ही कागदपत्रे योग्य शासकीय कार्यालयानेच दिलेलीच जोडणे आवश्यक आहे. पुराव्याच्या कागदपत्रांच्या सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे.पुराव्याची कागदपत्रे अर्जासोबत नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.
8. वाहनचालक पदासाठी उमेदवाराने जड वाहन चालविण्याच्या परवान्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
9. उमेदवारांनी आपले अर्ज नोंदणी पोष्टाद्वारे वरील पत्त्यावर दिनांक 22 नोव्हेंबर 2013 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर पोष्टाद्वारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणाऱ्या अर्जाचा अथवा त्या संबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.
10. वयाबाबत जन्मतारखेचा दाखला माध्यमिक शाळा प्रमाणपत्रावरुन ग्राहय धरता येईल. सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
11. निवड झालेल्या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.
12. वरील अटींची पूर्तता होत नसल्यास अर्जदाराचा अर्ज रद्द करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना आहेत. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
उपसंचालक (माहिती)
महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली

## अर्जाचा नमुना

| शुल्क म्हणून जोडलेल्या धनाकर्षाचा तपशिल (धनाकर्षामागे अर्जदाराने आपले पूर्णनांव लिहावे) | धनाकर्ष क्रमांक (डीडी) | बँकेचा तपशिल |
|---|---|---|
| | | |

| कार्यालयीन उपयोगासाठी | नोंदणी क्रमांक : दिनांक : | तपासणाऱ्याची स्वाक्षरी | |
|---|---|---|---|
| पात्र | अपात्र असल्यास कारणे | प्रथम | द्वितीय |
| आहे | | | |
| नाही | | | |

उमेदवाराने स्वत:चे अलीकडील छायाचित्र येथे चिकटवावे व त्यावर स्वाक्षरी करावी

प्रति,
मा.उपसंचालक (माहिती),
महाराष्ट्र परिचय केंद्र,
महाराष्ट्र शासन, ए/8,
स्टेट एम्पोरिया बिल्डिंग,
बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली – 110 001

**विषय : .......................................... या पदासाठी अर्ज**

1. संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) :
2. वडिलांचे/ पतीचे नांव :
3. सध्याचा पत्ता :
4. कायमचा पत्ता :
   दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :
   इ-मेल आयडी :
5. जन्म तारीख (अंकात) : दिनांक महिना वर्ष
   व अक्षरात :
6. जाहिरातीसाठी अर्ज करण्याच्या : वर्ष महिना दिवस
   अंतिम दिनांकास वय
7. जात : (खालीलपैकी योग्य तेथे ( √ ) खूण करावी)

| अ.जाती | अ.जमाती | वि.मा.प्र. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

8. जात प्रमाणपत्र सादर करीत आहात काय? होय / नाही
9. असल्यास कोणी निर्गमीत केले ........................................
10. महाराष्ट्राचे रहिवासी आहात का? होय / नाही
11. विवाहीत / अविवाहित : होय / नाही
12. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शिक्षण | उत्तीर्णवर्ष | टक्केवारी | श्रेणी | परिक्षा मंडळ विद्यापीठ/मान्यताप्राप्त संस्था |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

13. सेवायोजन कार्यालयाचे/समाज कल्याण/प्रकल्प अधिकारी यांचेकडे नांव नोदणी केली आहे काय? (नोंदणीपत्राची प्रत जोडावी)

(1) होय/नाही (2) ठिकाण : (3) नोंदणी क्रमांक व दिनांक:

14. वाहनचालविण्याच्या परवान्याची प्रत जोडली आहे /नाही.

15. वाहनचालक पदाच्या बाबतीत जड वाहन चालविण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभवासंबंधीचे प्रमाणपत्र (जोडले आहे/नाही)

16. कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत थोडक्या माहिती : (अनुभवाचे प्रमाणपत्र जोडावे)

| कार्यालयाचे नांव | धारण केलेले पद | कालावधी | कामाचे स्वरुप | अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

17. उमेदवाराची इतर माहिती :

18. प्रमाणित करण्यात येते की, अर्जात नमुद केलेली माहिती खरी असून ती माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द ठरेल याची मला जाणीव असून मी दंडात्मक कार्य वाहीस पात्र ठरेन.

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराची सही

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना – अ**

**प्रतिज्ञापन**

**नमुना – अ (नियम 4 पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ........................................ श्री. ........................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ............. वर्षे, राहणार ............................. याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1. मी ................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........... आहे. (असल्यास, जन्मादिनांक नमूद करावा.)
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि.28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराची सही